नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/११/२०२५ (शनिवार )**

## दहशतवादी घटनांमध्ये प्रथम प्रतिसाद देण्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयात जलद प्रतिसाद पथक ( Quick Response Team) ची करण्यात आली स्थापना

दहशतवादी घटनांमध्ये तसेच आपत्कालीन परिस्थितींचा त्वरित व प्रभावी सामना करण्यासाठी जिल्हा पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण येथे जलद प्रतिसाद पथक ( **Quick Response Team** ) ची दिनांक १४/११/२०२५ रोजी स्थापना करण्यात आली आहे. QRT हे एक विशेषीकृती युनिट असून, दहशतवादी घटनांमध्ये प्रथम प्रतिसाद देण्यासाठी आणि त्वरित कारवाई करण्यासाठी तसेच आपत्कालीन घटनेस तात्काळ प्रतिसाद देणे साठी स्थापित करण्यात आले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हा **QRT** मध्ये एकुण ५ पोलीस अधिकारी आणि ५१ पोलीस अंमलदार यांचा समावेश असून त्यांना अत्याधुनिक वाहने आणि उपकरणांनी सज्ज करण्यात आले आहे. जिल्ह्यात कुठेही दहशतवादी घटना, आपत्कालीन प्रसंग अथवा विशेष घटनांवर तत्परतेने कारवाई करण्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयाचे जलद प्रतिसाद पथक ( **Quick Response Team** ) सज्ज आहे.









## खुन करणाऱ्या आरोपीला २४ तासाच्या आत केले अटक

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** फिर्यादी नामे उत्तमराव नागोराव गवळी, वय ७० वर्ष, व्यवसाय शेती, रा. थुगावदेव ता. नरखेड जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनांक २०/११/२०२५ रोजी फिर्यादी यांचा मुलगा नामे मृतक शरद उत्तमराव गवळी, वय ४२ वर्ष, रा. थुगाव देव ता. नरखेड जि.नागपूर हा बकऱ्या चारण्यासाठी शेतात गेला परंतु परत न आल्याने त्याचा शोध घेतला असता त्याचा मृतदेह मौजा बोपापुर शेतशिवारात कुंभारे यांचे शेताचे काठावर दिनंका २१/११/२०२५ रोजी सकाळी ०७/०० वा. मिळुन आला. **आरोपी नामे किशोर सावलकर, वय ३९ वर्षे, रा. धारणी, जि. अमरावती** याने मृतकाचे आरोपीच्या पत्नीसोबत अनैतिक संबध असल्याचे कारणावरून त्याचा खुन केला. अशा रिपोर्ट वरून कलम १०३(१) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर घटनास्थळी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी भेट देवुन तपाथ पथकांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.

नमुद आरोपी हा गुन्हा केल्यापासुन मिळुन येत नव्हता. स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण आणि जलालखेडा पोलीस यांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने संयुक्तरित्या शोध घेत अवघ्या २४ तासाच्या आत आरोपीचा शोध घेवुन त्याला दिनांक २२/११/२०२५ रोजी धारणी, जंगल परीसरातुन ताब्यात घेतले.**नमुद आरोपीला अटक आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ८ गोवंश जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २१/११/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपुर मार्गाने एका पिकअप वाहन .क्र एम.एच ४० सी.क्यु ५१७८ या वाहनामध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा माथनी टोल प्लाझा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पिकअप वाहन .क्र एम.एच ४० सी.क्यु ५१७८ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता आरोपी क्रं १) चालक

मोहम्मद मोईन असफाक मोईन, वय २५ वर्षे,रा. सय्यद नगर, कामठी आणि आरोपी क्रं २) क्लिनर  गुलशेर खान पटेल मुनिर, खान वय २२ वर्षे, रा. न्यु हनुमान मंदीर, जुनी खलासी लाईन कामठी हे मिळुन आले. वाहन मालका बाबत विचारना केली असता वाहन मालक आरोपी क्रं ३) किशोरसिंग हिरासिंग चंदेल, वय ४८ वर्षे,रा. वार्ड क्र. ०१ बेलोना, ता. नरखेड  हा असल्याची माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली  असता त्यामध्ये ८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप वाहन .क्र एम.एच ४० सी.क्यु ५१७८ आणि ८ गोवंश जनावरे असे एकुण किंमती ५,४४,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नुमद प्रकरणी तिन्ही आरोपीतांविरूध्द कलम ११(१) (ड) (ई)  प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्ड वरील गुन्हेगार सुधाकर महादेव सराटे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्पार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी सुधाकर महादेव सराटे, वय ५० वर्षे, रा. उबाळी, ता. कळमेश्वर ,जि नागपुर याला ६ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्पार केले आहे.**

नमुद आरोपीवर दखलपात्र तसेच अदखलपात्र असे विविध कलमान्वये अनेक गुन्हे दाखल असुन नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याचे सवयीचा आहे. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी आरोपीवर गुन्हे नोंद करून त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी नामे सुधाकर महादेव सराटे, याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्पार करण्याचा प्रस्ताव कळमेश्वर पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून आरोपी नामे म सुधाकर महादेव सराटे, वय ५० वर्षे, रा. उबाळी, ता. कळमेश्वर ,जि नागपुर याला ६ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्पार केल्याचा आदेश पारीत केला आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



# आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता मौदा पोलीस स्टेशन येथे काढण्यात आला रूट मार्च

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नमुद निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २२/११/२०२५ पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत रूटमार्च काढण्यात आला. सदर रूट मार्च पोलीस स्टेशन ,जयस्तंभ चौक , शिवाजी महाराज चौक, गुरूदेव चौक बसस्टॅड ते परत पोलीस स्टेशन मौदा या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, श्री विवके मेश्राम, मुख्याधिकारी, नगरपंचायत मौदा, पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्यासह पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.





## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २४ गुन्हे नोंद.

दिनांक २१/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण १,९३,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १

गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे १गुन्हा नोंद आहे महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २४ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७२०० मिली देशी दारू, ११०३ लीटर मोहाफुल दारू, २०० लिटर सडवा, १८०० मिली विदेशी दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण १,९३,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६४८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २२/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६४८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २५ आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४६ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने